
सुनील दत्तची अविस्मरणीय निर्मिती
मुझे जीने दो





सुनीलची दोन रूपंः नेता आणि डाकू

***गं**भीर विषय असूनही सिल्वर ज्युबिली साजरी करणाऱ्या या चित्रपटाच्या निर्मितीविषयीच्या अनेक आठवणी...*

□ इसाक मुजावर

जिस *देश में गंगा बहती है*नंतर चंबळच्या खोऱ्यातील दरोडेखोरांच्या जीवनावर निघालेल्या व चंबळच्या खोऱ्यातच चित्रित झालेला आणखी एक चित्रपट म्हणजे सुनील दत्तच्या अजंठा आर्ट्सचा *मुझे जीने दो*. *जिस देश में गंगा बहती है* १९६०ला पडद्यावर आला होता आणि *मुझे जीने दो* १९६३ला.

सुनील दत्तला अभिनेता म्हणून यश मिळवून देणारा पहिला चित्रपट १९५७चा *मदर इंडिया*. या चित्रपटातील त्याची भूमिका एका दरोडेखोराचीच होती. *मदर इंडिया*ने त्याला दिलेली दरोडेखोराच्या भूमिकेची प्रतिमा *मुझे जीने दो*ने एकदम गडद करून टाकली. आणि त्यानंतर *रेश्मा और शेरा, हीरा, प्राण जाये पर वचन न जाये, आखरी गोली, काला आदमी, अहिंसा, मुकाबला, गंगा और सूरज, लहू पुकारेगा, मंगलदादा* यासारख्या अनेक चित्रपटात त्याने दरोडेखोराचीच भूमिका केली.

१९६४च्या *यादें* या एकपात्री चित्रपटाद्वारा सुनील दत्त निर्मात्याचा दिग्दर्शक बनला. पण *मुझे जीने दो*च्या वेळी तो फक्त निर्माता होता आणि बिमल रॉय यांच्या पठडीतील एक दिग्दर्शक मोनी भट्टाचार्य यांनी हा चित्रपट दिग्दर्शित केला होता. १९६०चा बिमल रॉय यांचा मोनी भट्टाचार्य दिग्दर्शित *उसने कहा था*मध्ये सुनील दत्त नायक होता. तो फारसा चालला नव्हता. तरीही मोनी भट्टाचार्य यांचा वकूब तेव्हा त्याने ओळखला होता. यामुळेच अजंठा आर्ट्स या स्वतःच्या चित्रसंस्थेची स्थापना करून निर्मितीक्षेत्रात पदार्पण केल्यावर *मुझे जीने दो* या आपल्या पहिल्या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची जबाबदारी त्याने मोठ्या विश्वासाने त्यांच्याकडेच सोपवली आणि त्यांनीदेखील त्याच्या या विश्वासाला तडा जाऊ दिला नाही. *उसने कहा था*च्या अपयशावर मात करून रौप्यमहोत्सवी यश या चित्रपटात त्यांनी मिळवलं. या चित्रपटानेच सुनील दत्तला सर्वात प्रथम १९६३चं सर्वश्रेष्ठ अभिनेत्याचं फिल्मफेअर पारितोषिक मिळवून दिलं.

*मुझे जीने दो*मध्ये सुनील दत्तची नायिका होती वहिदा रहमान. तिच्याबरोबर सुनील दत्तने *एक फूल चार कांटे, मुझे जीने दो, मेरी भाभी, दर्पण, रेश्मा और शेरा, जमीन, आसमान, जिंदगी जिंदगी* या सात चित्रपटांत एकत्र भूमिका केली. १९६०चा *एक फूल चार कांटे* त्या दोघांचा पहिला चित्रपट. तेव्हा ती गुरुदत्त फिल्म्सशी करारबद्ध होती आणि गुरुदत्त फिल्म्सच्या बाहेर अन्य कोणाही निर्मात्याच्या चित्रपटातील भूमिका गुरुदत्त फिल्म्सच्या संमतीशिवाय तिला करता येत नव्हती. *एक फूल चार कांटे*मधील भूमिका स्वीकारताना तिने आधी गुरुदत्त फिल्म्सची संमती घेतली होती. पाच वर्षांचा हा करार पुढे चालू ठेवण्याचे सर्व हक्क गुरुदत्त फिल्म्सने स्वतःकडे ठेवले

होते. पहिला पाच वर्षांचा करार संपत आला तरीही नवा करार करण्याची आवश्यकता त्यांना वाटली नाही. कारण सलग पाच वर्षे तिच्याबरोबर काम करताना ती आता गुरुदत्त फिल्म्सला सोडून जाणार नाही, अशी खात्री त्यांना वाटू लागली होती. तिच्याविषयी त्यांच्यात एक विश्वास निर्माण झाला होता. या विश्वासामुळेच संपलेला करार नव्याने वाढवण्याची तसदी त्यांनी घेतली नाही. वहिदाने याचा फायदा घेतला. करार संपल्यावर *मुझे जीने दो*मधील भूमिका स्वीकारताना गुरुदत्त यांच्याशी सल्लामसलत करण्याची आवश्यकता तिला वाटली नाही. गुरुदत्त यांच्याबरोबर असलेल्या तिच्या संबंधात त्यानंतर हळूहळू एक अंतर निर्माण होत गेलं. या अंतरामुळे *साहिब बीबी और गुलाम* या चित्रपटाबरोबरच गुरुदत्त फिल्म्सशी असलेले तिचे संबंध संपुष्टात आले आणि या चित्रपटाचे चित्रण चालू असतानाच *मुझे जीने दो*च्या चित्रणात भाग घ्यायला सुरुवात करून तिने स्वतःला गुरुदत्त फिल्म्सपासून एकदम अलग करून घेतलं. *मुझे जीने दो*मधील भूमिका तिने गुरुदत्त फिल्म्सची संमती न घेता आपल्या मर्जीने स्वीकारलेली पहिली भूमिका.

*मुझे जीने दो*च्या काळात हेलन आपल्या चित्रपटातील एक लोकप्रिय नृत्यतारका होती. तिच्या आधीचं युग कक्कू या नृत्यतारकेचं होतं. हेलनचा उदय झाल्यानंतर तिचं हे युग संपुष्टात आलं होतं. *मुझे जीने दो*च्या वेळी तर ती चित्रपटव्यवसायातून एकदम फेड आऊट झाली होती, तरीही सुनील दत्तने *मुझे जीने दो*मधील एका नृत्यात मधुमतीबरोबर तिला पडद्यावर सादर केलं होतं. कारण नरगीसची ती खास मैत्रीण होती. *मुझे जीने दो*मधील नृत्य चित्रपटातलं तिचं शेवटचं नृत्य. या नृत्यानंतर ती चित्रपटापासून एकदम दूर गेली होती. पण नरगीसबरोबरची तिची मैत्री त्यानंतरही टिकून होती. मे १९८१मध्ये नरगीसचं निधन झाल्यावर चारच महिन्यांनी कक्कूनेदेखील या जगाचा निरोप घेतला.

१९८१चा *रॉकी* संजय दत्तने नायकाची भूमिका केलेला पहिला चित्रपट. हा चित्रपट सेटवर गेला तेव्हा नरगीस आपल्यात होती आणि आपल्या मुलाने नायकाची भूमिका केलेला पहिला चित्रपट पाहायची तिची उत्सुकता काही पूर्ण झाली नाही. *रॉकी* पडद्यावर यायच्या आधीच तिचं निधन झालं. पण संजय दत्त लहान होता तेव्हा दोन चित्रपटांत त्याला पडद्यावर पाहायचं भाग्य तिला लाभलं. *मुझे जीने दो* व *रेश्मा और शेरा* या दोन्ही चित्रपटांत संजय दत्त बालकलाकार होता.

दरोडेखोराच्या जीवनावरील चित्रपट म्हटला की त्या चित्रपटात एखादा तरी घोडा असतोच. *मुझे जीने दो*मध्येदेखील एक घोडा होताच. सुनील दत्तने या चित्रपटासाठी तो विकत घेतला होता आणि चित्रपट पूर्ण झाल्यानंतर तो त्याने विकून टाकलेला नव्हता, सांभाळला होता. *रेश्मा और शेरा* या चित्रपटातदेखील तो घोडा होताच. या चित्रपटाच्या अपयशाने कर्जाचा एक प्रचंड डोंगर सुनील दत्तसमोर उभा राहिला होता. बाहेरच्या चित्रपटातील भूमिकादेखील तेव्हा त्याला मिळायच्या बंद झाल्या होत्या. अशावेळी या घोड्याचा आधार त्याला मिळाला. अनेक निर्माते तो चित्रणासाठी भाड्याने न्यायचे. यामुळे हा घोडा त्याचे उत्पन्नाचे एक साधन झाले होते. १९७९ला सुनील दत्तच्या *अहिंसा*मध्येदेखील हा घोडा होता. औरंगाबादला त्याचं चित्रण चाललं असताना तेथे तो घोडा आजारी पडला आणि त्याचं निधन झालं. तेव्हा औरंगाबादला त्याची अंत्ययात्रा काढून त्याचा अंत्यसंस्कार केला गेला होता.

*मुझे जीने दो*मधील गाणी साहिर लुधियानवींची होती व ती जयदेवनी संगीतबद्ध केली होती. 'अब न कोई गुलशन उजडे...' हे यातील एकच गाणे रफीच्या आवाजात होते आणि ते त्याने कोरसबरोबर गायले होते. 'मोहे न यूं कोई घूर घूर कर देखे...', 'रात भी है कुछ भीगी भीगी...' ही यातील दोन गाणी लताबाईंनी कोरसबरोबर गायली व 'तेरे बचपन को जवानी की दुवा देती हूं...' हे एकटीने आणि 'नदी नारे ना जिओ श्याम पैया पड़ू...' हे एक गाणे आशाबाईंनी एकटीने गायलं होतं आणि 'मांग में भरले सखी...' हे गाणं कोरसबरोबर. या चित्रपटातील एकजात सारी गाणी लोकप्रिय ठरली होती.

या चित्रपटाचा रौप्यमहोत्सवी समारंभ सुनील दत्तने सुलोचना(रूबी मायर्स) आणि मा. निस्सार या ज्येष्ठ कलावंतांचा सत्कार करून साजरा केला. ✯



सुनील-वहिदाची हिट जोडीः *एक फूल दो कांटे* ▲
आणि *दर्पण* चित्रपटात ▼



आपल्या मालकीच्या लाडक्या घोड्यासह
▼ *राजमाता*च्या एका दृश्यात सुनील दत्त

